# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**
**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ४५**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आर-१**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य**<br>**रूपये:- १,२८,६४,४७,७२,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (१) | ५३१६ | १० | बुलढाणा जिल्ह्यात मलकापूर विधानसभा क्षेत्रामध्ये किडनीच्या आजाराचे रुग्ण जास्त प्रमाणात असल्यामुळे मतदारसंघातील किडनीच्या रुग्णांची डायलिसीस ची आवश्यक असलेली गरज लक्षात घेता मलकापूर विधानसभा क्षेत्रातील लोकप्रतिनिधी वारंवार तत्कालीन आरोग्यमंत्री व आरोग्य विभागाकडे पाठपुरावा केल्यामुळे आरोग्य विभागाकडून डायलिसिस सेंटर सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले मशीन आर.ओ. प्लांट व इतर उपकरणे खरेदी करण्यासाठीच्या निविदा प्रक्रियेस प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात दिनांक 25/10/2021 रोजी शासन निर्णय काढण्यात आला संचालक आरोग्य विभाग यांच्याकडून व्यवस्थापकीय संचालक मे. हापकिन जीव-औषध निर्माण महामंडळ परेल मुंबई यांना दिनांक 25/10/2019 च्या शासन निर्णयानुसार खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कारवाई करण्यात यावी याकरिता पत्र पाठवण्यात आले होते तरी सुद्धा खरेदी प्रक्रिया प्रलंबित असल्यामुळे संचालक आरोग्य सेवा यांनी संबंधित मतदार संघातील लोकप्रतिनिधी यांचेकडून सतत पाठपुरवठा होत असून, डायलिसिस युनिट खरेदी बाबत प्रक्रिया पूर्ण करण्याकरता तात्काळ कारवाई करावी अशा आशयाचे पत्र पुन्हा दिनांक 30/05/2022 रोजी पाठवण्यात आले परंतुअद्याप पर्यंत खरेदी प्रक्रिये बाबत कुठलीही कार्यवाही झालेली नाही, शासनाने तातडीने खरेदी बाबत करावयाची कार्यवाही. |
| (२) | ५३२४ | १० | बुलढाणा जिल्हयातील मलकापुर तालक्यातील शहराची व ग्रामीण भागाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता जिल्हा उपरुग्णालय च्या इमारत व कर्मचारी निवासस्थान चा प्रस्ताव शासनस्तरावर मंजुरीकरीता प्रलंबीत असणे. शासनाने प्रस्तावास मान्यतेबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (३) | ५२३४ | १० | अमरावती जिल्हयातील शासकीय आरोग्य यंत्रणा अपु-या मनुष्यबळाअभावी कोलमडली असून येथील जिल्हा सामान्य रुग्णालय इर्विन येथे वर्ग 1 च्या वैद्यकीय अधिका-यांची एकुण 22 पदे मंजूर असताना 11 पदे रिक्त आहेत. रुग्णालयातंर्गत जिल्हयात 22 रुग्णालये असून या सर्व रुग्णालयांमध्ये वर्ग-3 च्या कर्मचा-यांचे 642 |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | मंजूर पदांपैकी 175 पदे रिक्त तर वर्ग-4 च्या 354 पदांपैकी 125 पदे रिक्त आहेत, वर्ग-2 च्या वैद्यकीय अधिका-यांची 19 पदे रिक्त आहे, रिक्त पदांमुळे येथील रुग्णसेवेवर विपरीत परिणाम होऊन येथील कर्मचारी व अधिका-यांवर कामाचा प्रचंड ताण निर्माणा होत, करीता रिक्तपदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात यावी. |
| (४) | ५२५४ | १० | नांदगाव पेठ (जि.अमरावती ) येथील राष्ट्रीय महामार्गावर होणा-या अपघातांमध्ये जखमींना तातडीने वैद्यकीय सुविधा मिळावी आणि जखमींवर उपचार होवून त्यांचे प्राण वाचावे यासाठी येथील आरोग्य उपकेंद्र असलेल्या परिसरात ट्रामा केअर सेंटर उभारावे अशी येथील नागरिकांची मागणी गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे , शासनाने यासंदर्भात प्रस्ताव मागविला आहे शासनाने सदरील प्रस्तावाला तातडीने मंजूरी व निधी देऊन ट्रामा केअर सेंटर उभारण्याबाबत करावयाची कार्यवाही. |
| | | | **श्री. धिरज देशमुख** |
| (५) | ५१६४ | १० | मुरूड ता.जि.लातूर येथे ट्रामा केअर सेंटर व उपजिल्हा रूग्णालयास बांधकामासाठी निधी उपलब्ध करणेची आवश्यकता असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अमिन पटेल** |
| (६) | ५२२९ | १० | मुंबई येथील सर ज.जी.रुग्णालयात असणाऱ्या गैरसोयीमुळे रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांबरोबर त्यांचे नातेवाईक देखील त्रस्त असणे, सिटी स्कॅन, एमआरआय सारख्या अत्यावश्यक मशीन बंद असल्याने रुग्णांचे हाल होत असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजित पवार** |
| (७) | ५२६३ | १० | दिवसांत कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नजीकच्या जिल्ह्यांमधून १५ दिवसांच्या कालावधीसाठी नियुक्त्या करण्यात आलेले तज्ज्ञ ब-याचवेळा अनेक ठिकाणी पोहचत नाहीत किंवा दोन-तीन दिवस हजेरी लावून निघून जात असणे, मेळघाट तसेच नंदुरबार परिसरातील आदिवासींच्या कुपोषणाचे कारण डॉक्टरांच्या रिक्त जागा असल्याचे या प्रकरणाची सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयात विधिज्ञ मार्फत भूमिका मांडल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाने वर्ग-अ अंतर्गत येणाऱ्या विशेषज्ञाच्या १७८६ जागांपैकी तब्बल १११२ जागा रिक्त असल्याचे मान्य केले असणे, सदर रिक्त जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास परवानगी देत नसल्याची माहिती संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली असणे, मेळघाट तसेच नंदुरबार येथे बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञांची कायमस्वरूपी नेमणूक करणेसह कुपोषण तसेच बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (८) | ५२६८ | १० | नंदुरबार जिल्ह्यात कुपोषण व अपुऱ्या वैद्यकीय सेवांअभावी मागील ८ महिन्यात ८६ बालकांचा मृत्यू तसेच धारणी, चिखलदरा तालुक्यात (जि.अमरावती) एप्रिल ते जून २०२२ या कालावधीत ० ते ६ वर्ष वयोगटातील ५३ बालकांचा मृत्यू झाला असल्याचे उघडकीस येणे, मेळघाटात पावसाळ्याच्या दिवसांत कुपोषित बालके, गर्भवती तसेच स्तनदा मातांना बालरोग आणि स्त्रीरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नजीकच्या जिल्ह्यांमधून १५ दिवसांच्या कालावधीसाठी नियुक्त्या करण्यात आलेले तज्ज्ञ ब-याचवेळा अनेक ठिकाणी पोहचत नाहीत किंवा दोन-तीन दिवस हजेरी लावून निघून जात असणे, मेळघाट तसेच नंदुरबार परिसरातील आदिवासींच्या कुपोषणाचे कारण डॉक्टरांच्या रिक्त जागा असल्याचे या प्रकरणाची सुनावणी दरम्यान उच्च न्यायालयात विधिज्ञ मार्फत भूमिका मांडल्यानंतर वैद्यकीय शिक्षण विभागाने वर्ग-अ अंतर्गत येणाऱ्या विशेषज्ञाच्या १७८६ जागांपैकी तब्बल १११२ जागा रिक्त असल्याचे मान्य केले असणे, सदर रिक्त जागा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास परवानगी देत नसल्याची माहिती संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली असणे, मेळघाट तसेच नंदुरबार येथे बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञांची कायमस्वरूपी नेमणूक करणेसह कुपोषण तसेच बालमृत्यू रोखण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (९) | ५२७० | १० | पालघर जिल्हयात अनेक वाडी-वस्त्यांमध्ये अद्यापही प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रमीण रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा, तज्ञ डॉक्टर, डायग्नोस्टिक सेंटर, औषधे अशा सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येत असणे, मनोर-कुर्झे (जि.पालघर) गावातील प्रताप महेश तांबडे या साडेपाच वर्षीय बालकाचा सर्पदंशामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे मृत्यू झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असणे, जिल्हयात सर्पदंशाने अनेकांचे मृत्यू झाले असूनही अद्यापपर्यंत बहुतेक रुग्णालयांत सर्पदंशावर योग्य उपचार मिळत नसणे, याबाबत शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता, त्यानुसार पालघर जिल्हयातील नागरिकांसाठी अद्यावत आरोग्य सोयी-सुविधा तातडीने पुरविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (१०) | ५२७३ | १० | राज्य शासन व केंद्र शासनाकडून जन्मत:च कानाने ऐकू न येणाऱ्या लहान बालकांसाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम व ADIP या योजनेअंतर्गत कॉकलीअर इम्प्लांट (Cochlear Implant Surgery) शस्त्रक्रिया केली जात असून राज्यातील सर्व जिल्हयांत या कार्यक्रमाअंतर्गत दोन वर्षापर्यंतच्या बालकांवर दिनांक ०१ एप्रिल २०१३ पासून सदर सर्जरी (Cochlear Implant Surgery) केली जात असणे, यासाठी शासनाने नेमून दिलेले रुग्णालयांमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांकडून सर्जरी करीता पैशाची मागणी करण्यात येत असणे, पैशाअभावी उपचार करण्यास टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आले असणे, परिणामी बालकांना वेळेत उपचार होत नसल्याने त्यांचे वय वाढल्यामुळे शासनाच्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य योजनेच्या निकषात सदर बालके बसत नसल्याने त्यांच्यावर शस्त्रक्रिया (Cochlear Implant Surgery) केली जात नसणे, या योजनेअंतर्गत उपचाराकरीता बालकांचे वय हे पाच |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | वर्षापर्यंत करण्याबाबत मा.आरोग्य मंत्री यांना दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबतीत राष्ट्रीय बाल स्वास्थ योजने अंतर्गत उपचारासाठी वयोमर्यादेत वाढ करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (११) | ५२८० | १० | राज्यातील ग्रामीण, उपजिल्हा रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आदी ठिकाणी इंडियन पब्लिक हेल्थ स्टॅन्डर्सने (आयपीएचएस) ठरवून दिलेल्या सुविधांच्या मापदंडाकडे आरोग्य विभागाने दूर्लक्ष केल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, सात जिल्ह्यांतील ४२ टक्के आरोग्य संस्थांमध्ये परिपूर्ण आरोग्य सुविधा नसल्याची धक्कादायक बाब लेखापरिक्षणा दरम्यान निदर्शनास आली असणे, पुरेशा प्रमाणात निधी असूनही आरोग्य विभागात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात असुविधा आढळून येत असणे, याबाबत शासनाने चौकशी करुन करावयाची कार्यवाही |
| (१२) | ५२८२ | १० | राज्यात महिलांच्या आरोग्याच्या समस्या जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने संजीवनी हे अभिनव अभियान राबविण्यात येत असून त्यात लातूर जिल्ह्यातील ११६ महिलांना कर्करोगाची पूर्वावस्था (प्री कॅन्सर) असल्याचे निदर्शनास आले असणे, कर्करोगाची पूर्वावस्था याच्या उपचारासाठी जन आरोग्य आयुष्यमान योजनेत समावेश नसल्याने सदर गरीब महिला उपचारापासून वंचित राहिल्या असणे, जन आरोग्य आयुष्यमान योजनेत कर्करोगाची पूर्वावस्था (प्री कॅन्सर) या आजाराचा समावेश करून राज्यातील सर्व जिल्ह्यातील महिलांना या योजनेचा लाभ देण्याची आवश्यकता याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यासंदर्भात करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (१३) | ५२८५ | १० | मेळघाटसारख्या अतिदुर्गम व इतर आदिवासी भागामध्ये कुपोषण व इतर आरोग्य समस्यांचे मोठे प्रमाण असल्याने येथे ४ प्राथमिक आरोग्य केंद्र, १३ प्राथमिक आरोग्य उपकेंद्राना दिनांक १४ जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजुरी मिळाली असून या नवीन इमारत बांधकामासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, धारणी या विभागाकडे नियमित पत्रव्यवहार केला असून देखिल अद्यापपर्यत कोणतीही कार्यवाही केली नसणे, या भागासाठी शासन कोट्यवधी निधी राखून ठेवत असून आरोग्याशी संबंधित बांबीवरील प्रकल्पासंदर्भात विभागाचे दुर्लक्ष होत असणे, मेळघाट येथे प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राच्या इमारत बांधकामासाठी जागा उपलब्ध करून करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (१४) | ५२८६ | १० | पुणे शहरातील खाजगी रुग्णालयाची तपासणी ''रुग्ण हक्क मोहीम' व 'साथी' यांच्यावतीने माहे ऑक्टोबर ते डिसेंबर, २०२२ या यादरम्यान केली असता शहरातील ४० पैकी केवळ ३ खासगी रुग्णालयांनी अटींची पूर्तता केल्याचे निदर्शनास आले असून अन्य खाजगी रुग्णालयात महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायद्यानुसार कोणत्याही अटींची पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आले असणे, प्रत्येक खाजगी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रुग्णालयांनी रुग्णांचे हक्क सांगणारी ‘रुग्ण हक्क सनद’ व त्यांच्याकडील उपचारांचे ‘दरपत्रक’ आणि रुग्णांसाठी ‘तक्रार निवारण कक्षाची’ माहिती दर्शनी भागात प्रदर्शित करणे कायद्याने बंधनकारक असताना त्याबाबत कार्यवाही होत नसणे, बॉम्बे नर्सिंग होम कायद्याअंतर्गत पुणे महापालिकाहद्दित ५० हून अधिक खाजगी रुग्णालयांनी परवान्याचे नुतनीकरण केले नसल्याचे निदर्शनास आले असणे, ही रुग्णालये बंद आहेत किंवा इतरत्र स्थलांतरीत केली आहेत याबाबतीत काही माहिती विभागाकडे नसणे, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अटींची पूर्तता न करणा-या खाजगी रुग्णालयांवर करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| (१५) | ५२८७ | १० | राज्यात “बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजने” अंतर्गत रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास अपघातग्रस्त रुग्णाची परिस्थिती स्थिर करण्यासाठी पहिल्या ७२ तासासाठी नजिकच्या अंगीकृत शासकीय किंवा खाजगी रुग्णालयामधुन ७४ उपचार पध्दतीच्या माध्यमातून उपचार देण्यात येणार असून त्यासाठी ३० हजार रुपयांपर्यंतचे विमा संरक्षण देण्याचे निश्चित केले असतानाही या निर्णयाची अंमलबजावणी होत नसणे, यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना. |
| | | | **श्री. अनिल पाटील** |
| (१६) | ५२१६ | १० | जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव येथील शासकीय रुग्णालयात ट्रोमा केअर सेंटर मध्ये तालुक्यातील 150 पेक्षा अधिक खेडेगावांसह शहरातील रुग्णू उपचारासाठी येत असणे परंतु रुग्णांना आवश्यक सेवा मिळत नसणे बऱ्याचदा वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी रुग्णालयात उपस्थित राहत नसणे त्यामुळे रुग्ण उपचाराविना घरी परतणे शासकीय रुग्णालय ट्रामा केअर सेंटर मध्ये डॉक्टर किंवा परिचारक ऐवजी सफाई कर्मचारी महिलाच इंजेक्शन देत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, त्यामुळे चाळीसगाव ट्रोमा केअर सेंटरची तात्काळ चौकशी करून दोशींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१७) | ५२८१ | १० | अमळनेर हे उत्तर महाराष्ट्रातील मध्यवर्ती शहर असून जळगाव,धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील लोकांची रहदारी असल्याने दळणवळण मोठ्या प्रमाणात वाढले असणे, त्यामुळे अपघात होण्याची ही संख्या वाढली असणे, अमळनेर येथे ट्रॉमा केअर सेंटर नसल्याने अपघातानंतर रुग्णास जळगाव किंवा धुळे शहरात उपचारासाठी न्यावे लागणे, जळगाव सुमारे 70 किलोमीटर असल्याने व धुळे 40 किलोमीटर असल्याने अपघात ग्रस्त रुग्णाच्या जीवास धोका असणे, अमळनेर येथे ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१८) | ५२८४ | १० | अमळगाव जिल्हा जळगाव येथील ग्रामीण रुग्णालयात अपुरा कर्मचारी वर्ग असल्यामुळे रुग्णांचे उपचाराअभावी हाल व गैरसोय होत असणे, सदर रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी परिचारक व इतर कर्मचाऱ्यांचे पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाय योजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. छगन भुजबळ** |
| (१९) | ५१७८ | १० | उपजिल्हा रुग्णालय येवला जि.नाशिक येथे अग्निप्रतिबंधक उपाययोजना, सांडपाणी व्यवस्था, पावसाचे पाणी साठवण परिसरात संरक्षक भिंत, काँक्रीट रस्ता व इतर अनुषंगिक बांधकाम करण्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ०४ मार्च २०२३ रोजी वा त्यासुमारास आरोग्य सेवा आयुक्त मुंबई यांचेकडे मागणी केलेली असणे, सदर कामाबाबत रु. १५०.०० लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक यांनी दि. २१.२.२०२३ अन्वये प्रस्ताव पाठविलेला आहे. उपजिल्हा रुग्णालय येवला येथे अग्निप्रतिबंधक उपाययोजना, सांडपाणी व्यवस्था, पावसाचे पाणी साठवण आणि संरक्षण भिंत व प्रस्तावातील इतर कामांची नितांत आवश्यकता असणे, या कामाला प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ५१७९ | १० | उपजिल्हा रुग्णालय येवला जि.नाशिक येथे नव्याने ट्रामा केअर युनिट मंजूर करणेसाठी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई या कार्यालयाने दि. १४ नोव्हेंबर २०२२ च्या पत्रान्वये शासनाला प्रस्ताव पाठविलेला असणे, येवला येथे १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय असणे, हे ठिकाण गुजरातकडून शिर्डीला पायी जाणाऱ्या पालखी मार्गावरील व वापी-पेठ नाशिक-औरंगाबाद प्रमुख राज्यमार्ग क्र. २ आणि सेंघना (म.प्र.) - नंदुरबार-मनमाड-येवला-शिर्डी राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५२ - जी या दोन्ही महामार्गांनी तसेच मनमाड- दौंड-पणजी आणि मनमाड -औरंगाबाद- सिकंदराबाद या दोन्ही लोहामार्गावरील महत्वाचे ठिकाण असणे, दक्षिण भारतातून शिर्डीला जाणारे हजारो प्रवाशी हे येवला येथील नगरसूल रेल्वे स्टेशनवरून मोटारीने शिर्डीला जात असणे, येवला तसेच जवळच असलेले लासलगाव हे आशिया खंडातील कांद्याचे सर्वात मोठे आगार असणे, त्यामुळे या ठिकाणी असणारी लोकांची गर्दी व अपघाताचे प्रमाण लक्षणीय असल्यामुळे अपघातग्रस्त रुग्णांना वेळेवर वैद्यकीय सुविधा पुरविणे आवश्यक असणे,. यासाठी येवला येथे ट्रामा केअर युनिट स्थापन करण्याची अत्यंत आवश्यकता असणे, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या प्रस्तावानुसार उपजिल्हा रुग्णालय येवला जि.नाशिक येथे ट्रामा केअर युनिट मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपयायोजना. |
| (२१) | ५१८० | १० | लासलगाव ता.निफाड जि. नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्यामुळे अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता देऊन अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, लासलगाव ता. निफाड येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० ‘खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये शासन निर्णय क्रमांक -स्थापना २०२१/प्र.क्र. ३०२, आरोग्य ३ मुंबई दि. ६ एप्रिल २०२२ अन्वये श्रेणीवर्धन करण्यात आलेले असणे, सदर ३० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीचे बांधकाम करणेबाबत रु. ९३९.४३ लक्ष |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रकमेचे अंदाजपत्रक व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी संचालक आरोग्य सेवा संचालनालय मुंबई यांनी शासनाकडे दि. ४ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रस्ताव पाठविलेला असणे, लासलगाव ता.निफाड जि.नाशिक येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या उपजिल्हा रूग्णालयामध्ये श्रेणीवर्धन झाल्यामुळे अतिरिक्त २० खाटांच्या मुख्य इमारतीच्या बांधकामाचे अंदाजपत्रके व आराखडे यांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपायायोजना. |
| (२२) | ५१८१ | १० | ग्रामिण रुग्णालय नगरसुल जि. नाशिक येथील इमारत दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी मिळणेसाठी लोकप्रतिनिधी यांनी अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडे मागणी केलेली असणे, ग्रामिण रुग्णालय नगरसुल ता. येवला, जि.नाशिक येथील इमारत दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे तसेच कर्मचारी निवासस्थान दुरुस्ती व संरक्षण भिंत बांधणे या रक्कम रु. ४९९.९४ लक्षच्या पाच कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांनी दि. २० मे, २०२२ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे, सदर प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | ५१८३ | १० | सन २०११ च्या जोड बृहत आराखड्यानुसार नाशिक जिल्ह्यात मौजे चिचोंडी बु., धामणगाव ता. येवला व खेडलेझुंगे ता.निफाड या तीन ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ नाशिक यांनी दि. २६ मे, २०२२ च्या पत्रान्वये आरोग्य सेवा आयुक्तालयाला प्रस्ताव पाठविलेला असणे, सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा आणि जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्यात आलेली असणे, या भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी येथे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र निर्माण करण्याची नितांत आवश्यकता असणे, सन २०११ च्या जोड बृहत आराखड्यानुसार सदर तीन ठिकाणी नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२४) | ५१८४ | १० | सन २०११ च्या जोड बृहत आराखड्यानुसार येवला (जि. नाशिक) तालुक्यात अंगुलगांव, शिरसगांव लौकी, उंदिरवाडी आणि कुसमाडी येथे नवीन आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यासाठी उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ नाशिक यांनी दि. २६ मे २०२२ च्या पत्रान्वये आरोग्य सेवा आयुक्तालयाला प्रस्ताव पाठविलेला असणे, अंगुलगांव, शिरसगांव लौकी, उंदिरवाडी आणि कुसमाडी ता. येवला जि. नाशिक येथे आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यासाठी जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा आणि जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्यात आलेली असणे, या भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी वरिल नवीन उपकेंद्रांची नितांत आवश्यकता असणे, सन २०११ च्या जोड बृहत आराखड्यानुसार येवला (जि. नाशिक) तालुक्यात अंगुलगांव, शिरसगांव लौकी, उंदिरवाडी आणि कुसमाडी येथे नवीन आरोग्य उपकेंद्र मंजूर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२५) | ५१९६ | १० | राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत नाशिक जिल्ह्यात आरोग्य संस्थांमध्ये कंत्राटी तत्वावर नेमलेल्या सुमारे ६५० वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून ते सफाई कामगारांना दोन महिन्यांपासून वेतन मिळालेले नसल्याने तुटपुंज्या वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली असणे, राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये काम करणाऱ्या नियमित आरोग्य कर्मचाऱ्यांचे सुद्धा सतत अनियमित आणि विलंबाने पगार होत असल्यामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण असणे, राज्यातील कंत्राटी व नियमित आरोग्य कर्मचाऱ्यांचे वेतन नियमितपणे होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. धनंजय मुंडे** |
| (२६) | ५२३५ | १० | बीड जिल्ह्यातील परळी उपजिल्हा रुग्णालयात डॉक्टर, विविध तज्ञ तसेच अन्य पॅरा मेडिकल कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने रुग्णांची प्रचंड गैरसोय होत असल्याने ही रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत याबाबत होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| (२७) | ५२३८ | १० | राज्यभरात बहुतांश वैद्यकीय सेवा देणारे पदव्युत्तर पदवी धारक वैद्यकीय अधिकारी हे स्वतःचे खाजगी दवाखाने देखील चालवत असणे, खाजगी दवाखान्यात व्यवसाय वृद्धी साठी शासकीय दवाखान्यात सुविधांचा कृत्रिम तुटवडा दाखवून खाजगी दवाखान्यात पाठवले जात असणे, तसेच वैद्यकीय अधिकारी पूर्णवेळ शासकीय रुग्णालयात उपस्थित नसणे, वैद्यकीय अधिकाऱ्यांना पूर्णवेळ नियमित आपल्या शासकीय रुग्णालयात सेवा देता यावी, त्या वेळेत त्यांचे खाजगी रुग्णालय बाह्य रुग्ण विभाग (OPD) बंद ठेवावे असा नियम करण्याबाबत होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| (२८) | ५३१० | १०० | जिल्ह्यातील परळी वैद्यनाथ तालुक्यात परळी ते बीड रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढले असणे, रस्ते अपघात झाल्यानंतर अपघात ग्रस्त व्यक्तीला उपचारास ट्रॉमा केअर सेन्टरची गरज भासत असणे, मात्र परळी ते बीड या 90 किलोमीटर अंतराच्या रस्त्यात केवळ तेलगाव (ता.धारूर) येथे एक ट्रॉमा केअर सेंटर अस्तित्वात असणे व ते काही वर्षांपासून बंद अवस्थेत असणे, परळी ते बीड रस्त्यावर पांगरी (गोपीनाथगड) या ठिकाणी उपलब्ध जागेत ट्रॉमा केअर सेंटर नव्याने उभे करण्याची तसेच तेलगाव ता.धारूर येथील ट्रॉमा केअर सेंटर पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्याची आवश्यकता व त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२९) | ५१८२ | १० | चंद्रपूर जिल्हयातील चार उपजिल्हा रुग्णालय, तर १० ग्रामीण रुग्णालयात मंजूर एकूण १०७१ जागांपैकी तब्बल ४१३ जागा रिक्त असल्याचे माहे जानेवारी,२०१३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, आरोग्य विभागातील वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना अति आवश्यक सेवा लागू करण्यात येणे, मात्र या सर्व रुग्णालयात डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या अनेक जागा रिक्त असल्याने रुग्णांना वेळीच उपचार मिळत नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असणे, अनेक ठिकाणी अति गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या रूग्णाना नागपूर येथे उपचारासाठी पाठविण्यात येणे, तर उपचारा अभावी अनेक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | रूग्णांचा मृत्यू होणे, त्यामुळे सर्व रुग्णालयातील रिक्त असलेल्या जागा त्वरीत भरण्यासाठी लोकप्रतिनिधीसह नागरिकांनी मागणी करीत असतांना सुध्दा नियमावर बोट ठेऊन रिक्त जागा भरण्यात आलेले नसणे त्यामुळे दिवसेदिवस रिक्त जागेत वाढ होत असल्याने पसरलेले नागरिकात तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण, परिणामी चंद्रपूर जिल्हयातील आरोग्य विभागातील ४१३ रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया." |
| (३०) | ५१८७ | १० | गेल्या अनेक दशका पासून चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयात हत्ती रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून येणे, शासनाकडून यावर औषधोपचार सुध्दा करण्यात येणे, मात्र एकदया व्यक्तीस एकदा हत्ती रोग झाल्यास तो रुग्ण बराच होत नसल्याचे दिसून येणे, हत्तीरोग झालेल्या रुग्णास कोणतेही काम करता येत नसणे, त्यामुळे अनेकदा त्याच्यावर उपासमाळीची पाळी येणे, यावर किती ही उपाययोजना केली तरी हत्ती रोगाचे रुग्ण दुरूस्तच होत नसून त्याचां हातास झाल्यास हात मोठया प्रमाणात सुजने, पायाला झाल्यास पाय मोठया प्रमाणात सुजने त्यामूळे त्यांना कायमचे अपंग येणे, असे असतांना सुध्दा हत्ती रोगामुळे कायमचे अपगंत्व आलेल्या रुग्णांना शासनाकडून कोणतीच सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने त्यांच्यात पसरत असलेले भितीचे व चिंतेचे वातावरण परिणामी राज्यात हत्तीरोग कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविण्यासाठी तसेच ज्या व्यक्ती हत्तीपायाचे रुग्ण असतो त्या रुग्णास अपंगत्व घोषित करून त्यांना अपंगत्वाच्या सर्वसांयी सवलती देण्यात यावे याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया |
| (३१) | ५१९२ | १० | राज्य शासनामार्फत राज्यात रुग्णसेवा देण्यात येत असणे,चंद्रपूर जिल्हयातील सावली व सिंदेवाही येथिल ५० खाटांच्या रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामास अघापही मंजूरी देण्यात आलेली नसणे, राज्यात आरोग्य केंद्राच्या इमारतींची अर्धवट असलेली बांधकामे, चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही सह राज्यातील वैघकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या निवासस्थानाच्या इमारतीच्या प्रस्ताव सुध्दा प्रलंबित असणे, बंद पडलेली आरोग्य तपासणी यंत्रे, डॉक्टर, कर्मचारी यांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असणे, पुरेशा ॲम्ब्युलन्स उपलब्ध नसणे, इत्यादी कारणांमुळे आरोग्य सेवेची दुरवस्था झालेली असणे, राज्यात सुमारे २९९ ठिकाणी सुरु असलेली बांधकामे, ती पूर्ण करण्याची गरज, रुग्णालयांच्या इमारती जीर्ण असून त्या नव्याने बांधणे किंवा त्या दुरुस्त करण्याची गरज, डॉक्टरांची व कर्मचाऱ्यांची सुमारे ५० टक्के पदे रिक्त असणे, यापैकी विशेषतज्ञांची ९१३ पदे तर तज्ञ डॉक्टारांच्या ११५२ जागा रिक्त असणे, ५० टक्के रुग्णवाहिका बदलण्याची आवश्यकता, राज्यात किमान ७५ नवीन डायलिसीस केंद्र सुरु करण्याची गरज, राज्यातील आरोग्य सेवेच्या रुग्णालयांसाठी जास्त निधीची आवश्यकता असताना कमी तरतूद करण्यात आल्याचे दिसून आलेले असणे, राज्यातील काही ग्रामीण रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे, सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्वावर दिलेली असून राज्यातील ३०० खाटांची रुग्णालये व त्या अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे पीपीपी तत्त्वावर खाजगी संस्थेस चालविण्यास देण्याचा शासनाचा सुरु असलेला विचार, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | त्यामुळेही आरोग्य सेवेवर परिणाम होण्याची शक्यता, जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदशिर्केनुसार दर दहा हजार लोकसंख्येमागे डॉक्टर व परिचारीकांचे प्रमाण ४४ असणे आवश्यक असताना राज्यात दर दहा हजार लोकसंख्येमागे केवळ आठ डॉक्टर आणि दहा परिचारीका असल्याचे केंद्रीय आर्थिक पाहणी अहवालावरुन उघडकीस आलेले असणे, आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याची गरज,याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपायोजना व शासनाची प्रतिक्रिया.” |
| (३२) | ५२०३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी येथे १०० बेडचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर झाले असणे, या रुग्णालयाची इमारत बांधकाम पुर्ण होऊन त्या ठिकाणी १०० बेड उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्यात येणे, या रुग्णालयासाठी शासनाने पदभरतीसाठी मान्यता देऊन त्या प्रमाणे प्रशासकीय आदेश निर्गमित करणे, या आदेशानुसार जिल्हा शल्य चिकित्सक चंद्रपूर यांनी ब्रम्हपूरी १०० बेड उपजिल्हा रुग्णालयाच्या पद भरती संदर्भाने प्रस्ताव अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांच्याकडे पाठविणे, मात्र अधापही यास मंजूरी देण्यात आलेली नसल्याने मोजक्याच वैघकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थित सदर रुग्णालय चालविण्यात येणे, कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदामुळे रुग्णांची गैरसोय होणे, याकडे कुणाचेही लक्ष नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले भितीचे व चिंतेचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील १०० बेड उपजिल्हा रुग्णालयाकरीता आवश्यक असलेले वैघकीय अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती तातडीने करणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. बळवंत वानखडे** |
| (३३) | ५३१८ | १० | दर्यापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात ग्रामीण भागातील रुग्णांची विविध आजारावरील उपचार आणि शास्त्रक्रियेसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असणे, सद्यस्थितीत या रुग्णालयात ५० खाटांची व्यवस्था असणे , परंतु दिवसेंदिवस वाढत असलेली रुग्ण संख्या यामुळे रुग्णांची गैरसोय होत असणे , यामुळे सदर उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांमध्ये श्रेणीवर्धन करण्याची नितांत आवश्यकता , याबाबत स्थानिक लॉप्रतिनिधी यांनी जिल्हा प्रशासनास लेखी पत्राद्वारे कळविले असणे , याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (३४) | ५१५३ | १० | मुंबई उपनगरात मालाड पश्चिम जनकल्याणनगर भुमि पार्क येथे सामान्य रुग्णालय असून या परिसरात दुसरे रुग्णालय नसणे, सामान्य रुग्णालय मालवणी या रुग्णालयात अंबोजवाडी, आवसा गांव, गणेश नगर, मालवणी, भांब्रेकर नगर, जनकल्याण नगर, खारोडी गांव व एरंगल गांव येथील रुग्ण मोठया प्रमाणावर येत असणे, या रुग्णालयात रुग्ण मोठया प्रमाणावर येत असल्याने सदरच्या रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करुन ३०० खाटांचे रुग्णालय करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रुग्णालयात अतिदक्षता विभाग, नवजात शिशू विभाग, विशेष कक्ष व आयुष सुविधा, कार्डिया उपचार केंद्र सुरु करणे, विशेष सेवा उपलबध करुन देणे उपरोक्त बाबी संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री , आरोग्य मंत्री, आयुक्त, आरोगय विभाग व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभागाकडे निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली असणे तथापि याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेली तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, शासनाने रुग्णालयाचे श्रेणी वर्धन करुन ३०० खाटांचे रुग्णालय करण्याबाबत करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| (३५) | ५१५४ | १० | राज्यात गोरगरीब रुग्णांसाठी महात्मा ज्योतिबा फुले आरोग्य योजना राबविण्यात येणे, राजीव गांधी योजना व इतर विविध योजना राबविण्याची गरज निर्माण झाली असणे, गरीब रुग्णांना औषधोपचार मिळत नसणे आयुर्वेद उपचार पध्दतीचा समावेश शासनाच्या योजनेमध्ये समावेश नसणे तथापि शासनाच्या योजनेत सामावून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, आयुर्वेद उपचार समावेश शासनाच्या योजनेमध्ये समावेश नसणे, तथापि शासनाच्या योजनेत सामावुन घेण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, आयुर्वेद उपचार घेणा-या रुग्णांची आर्थिक कुंचबणा होत असणे शासनाने आयुर्वेद उपचार राजीव गांधी व महात्मा ज्योतिबा फुले योजनेत समाविष्ट करण्याची गरज निर्माण झाली असणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना |
| (३६) | ५१५५ | १० | मुंबई उपनगरात मालाड, पश्चिम भूमी पार्क येथे शासनाचे सामान्य रुग्णालय असून या परिसरात दुसरे सामान्य रुग्णालय नसणे, त्यामुळे स्थानिकांना या रुग्णालयाचा स्थानिक रहिवाश्यांना आरोग्य सेवा उपलब्ध होत असणे, मात्र या ठिकाणी डॉक्टर कमी पडत असणे, शासनाने या रुग्णालयात डॉक्टरांना प्रतिनियुक्तीवर (Deputation) पाठविण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, या ठिकाणी ४ डॉक्टरांना प्रतिनियुक्तीवर पाठविण्याची गरज असून तीव्र निकड असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (३७) | ५१९७ | १० | जे.जे.रुग्णालय, भायखळा, मुंबई या रुग्णालयात जेष्ठ नागरीकाना आठवडयातील ६ दिवस विशेषबाहय रुग्ण सेवा विभाग सुरु केला असणे, तथापी ही योजना राज्यातील सर्व रुग्णालयांना सुरु करण्याची आवश्यकता असणे, जेष्ठ नागरीकांना विशेष कक्ष सुरु करण्याची गरज भासत असणे, सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे, जेष्ठ नागरीकांना रक्तदाब, मधुमेह, स्मृतीभ्रंश या सारखा आजारांचा सामना करावा लागत असणे, तसेच दृष्टी कमी होण, पोटांचे विकार, हृदयाचे विकारांच्या समस्यांनरा तोंड द्यावे लागत असणे, त्यामुळे जेष्ठांना प्राथम्यक्रम देण्याची आवश्यकता निर्माण झाले असणे, सदरची योजना राज्यभर सुरु करण्याची आवश्यकता असणे. |
| (३८) | ५१९९ | १० | राज्यात आर्थिक दुर्बल घटकांसाठी केंद्राची आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना राबविण्यात येत असून मात्र सदरच्या योजनेचे लाभार्थी असतांनाही महाराष्ट्रातील रुग्णांना त्या योजनेअंतर्गत उपचार करण्यात सीमेवर गुजरात राज्यातील रुग्णालयाकडून नकार दिला जात असणे, सीमेवर असलेल्या डहाणू, तलासरी |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | तालुक्यातील आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना आर्थिक भुर्दंड बसत असणे, गुजरात मधील रुग्णालयामधून महाराष्ट्रातील रुग्णावर उपचार करण्यास नकार दिला जात असणे, तथापि केंद्राची योजना असल्यामुळे महाराष्ट्रातील रुग्णांना सेवा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असणे, याकडे शासनाने अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ५२०१ | १० | राणीसावरगाव ग्रामीण रुग्णालय, ता.गंगाखेड, जि.परभणी या रुग्णालयात औषधाचा अपुरा पुरवठा असणे, या ठिकाणी वरिष्ठ डॉक्टर गरीब रुग्णांना बाहेरचे औषधे विकत आणण्यास सांगत असो, रुग्णालयात डॉक्टर उपस्थित नसणे, तोंडी व लेखी तक्रार करुनही त्याकडे लक्ष दिले जात नसणे, जिल्हा शल्य चिकित्सक त्या डॉक्टरांना पाठीशी घालीत असणे, जिल्हाशल्य चिकित्सा व संबंधित डॉक्टरांचे संगनमत असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी गरीब रुग्णांना मानसिक त्रास होत असणे, त्यामुळे स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीनी उपाययोजना. |
| (४०) | ५२०२ | १० | राज्यातील ग्रामीण भागात प्राथमिक ग्रामीण व जिल्हा रुग्णालयामध्ये १०८ क्रमांकाच्या तात्काळ सेवेतील रुग्णवाहिकांची संख्या अपूरी असणे, मौ. राणिसावरगांव , तांदूळवाडी, सिरसम (पालम)ता.गंगाखेड, जि.परभणी या ग्रामीण भागात तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध होत असणे, रुग्णवाहिका उपलबध असल्यातरी, वैद्यकीय अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी तात्काळ रुग्णवाहिका उपलब्ध करुन देत नसणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरिकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |
| (४१) | ५३१३ | १० | "चंद्रपूर जिल्हयातील चार उपजिल्हा रुग्णालय, तर १० ग्रामीण रुग्णालयात मंजूर एकूण १०७१ जागांपैकी तब्बल ४१३ जागा रिक्त असल्याचे माहे जानेवारी,२०२३ रोजी वा त्यासुमारास उघडकीस येणे, सदरील रुग्णालयात डॉक्टरच नसल्याने रुग्णांना वेळीच उपचार मिळत नसल्याने रुग्णांची हेळसांड होत असणे, त्यामुळे रुग्णांमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, करीता आरोग्य विभागातील ४१३ रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (४२) | ५२०४ | १० | सांगली या जिल्ह्याच्या ठिकाणापासून जत तालुक्याची सोमा १२५ कि.मी. अंतरावर असून अपघातग्रस्त रुग्णाला तातडीची वैद्यकीय सेवा सुविधा जत पासून सुमारे १२५ कि.मी. अंतरावरील मिरज येथे न्यावे लागत असणे, एकंदर अंतर व सद्यस्थितीतील रस्त्यांची अवस्था पाहता तोपर्यंत रुग्णाची स्थिती गंभीर होते व उपचारपूर्वी तो दगावण्याची शक्यता असणे, यासाठी अत्याधुनिक साधन सामग्रीने युक्त तज्ञवैद्यकीय पथकाचे मार्गदर्शनाने जत येथे ट्रामा केअर सेंटर होणे अत्यंत आवश्यक असून याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: आर-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२१०, वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- ४६,७८,०१,०००/-**<br>**श्री. धनंजय मुंडे** |
| (४३) | ५२४२ | १० | औषधी खरेदी करण्यासाठी प्राधिकरण स्थापन करण्याचे विधेयक विधिमंडळात चर्चेला आणलेले असताना, ते मंजूर होण्याआधी आवश्यक औषध खरेदी आरोग्य विभागाच्या आयुक्तांमार्फत व्हावी, असे आदेश निर्गमित करण्यात आलेले असणे, प्राधिकरण स्थापन होत असताना आयुक्तांमार्फत खरेदीची घाई केली जात असणे संशयास्पद असणे, हाफकीन संस्थेमार्फत औषध खरेदी केली जावी याबाबतचे शपथपत्र उच्च न्यायालयात शासनाने दिलेले असणे, यामुळे आयुक्तांमार्फत औषध खरेदीची प्रक्रिया थांबवून ती हाफकीन मंडळ किंवा प्रस्तावित प्राधिकरणाच्या माध्यमातूनच केली जावी अशी होत असलेली मागणी, त्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (४४) | ५१७६ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली येथे शासनाकडून ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धण करूनर नवीन ५० खांटाच्या उपजिल्हा रुग्णालय करून प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, या दोन्ही उपजिल्हा वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी टाईप १ व २ प्रस्ताव टाईप ३ व ४ अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करून जिल्हा शल्यचिकिस्तक जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांच्यामार्फतीने प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात येणे, रतसेच ब्रम्हपूरी येथील १०० खांटाचे उपजिल्हा रूग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थनाचे बांधकाम करण्यासाठी टाईप १ व २, टाईप ३ व ४ चे अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करून जिल्हा शल्यचिकिस्तक सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांच्यामार्फतीने प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात येणे, परंतू हे सर्व प्रस्ताव प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या विभागाकडे अंतिम मंजूरी विना प्रलंबित असल्याने नागरिकांना आरोग्याच्या सोईसुविधा पासून वंचित राहावे लागत असल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे सिंदेवाही व सावली येथील ५० खाटांचे उपजिल्हा रूग्णालररयरातील अधिकारी/कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम आणि ब्रम्हपूरी येथील वैघकीयअधिकारी/कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम करणेबाबतच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४५) | ५१७७ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली येथे शासनाकडून ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे परिवर्तीत नवीन ५० खांटाच्या उपजिल्हा रुग्णालय करून प्रशासकीय मान्यता देण्यात येणे, या दोन्ही उपजिल्हा रुग्णालयाच्या प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग चंद्रपूर यांनी रितसर प्रस्ताव तयार करून जिल्हा शल्यचिकिस्तक जिल्हा सामान्य रूग्णालय चंद्रपूर यांच्यामार्फतीने प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांच्याकडे अंतिम मंजूरीकरिता प्रस्ताव पाठविण्यात येणे, सिंदेवाही व सावली येथील उपलब्ध जागेच्या अनुशंगाने ५० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालय इमारत बांधकाम करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात येणे, परंतू हे सर्व प्रस्ताव प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या विभागाकडे अंतिम मंजूरी विना प्रलंबित असल्याने नागरिकांना आरोग्याच्या सोईसुविधा पासून वंचित राहावे लागत असल्याने नागरिकात पसरलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण त्यामुळे सिंदेवाही व सावली येथील ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे इमारत बांधकाम करणेबाबतच्या प्रस्तावास निधीसह प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १६ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सार्वजनिक आरोग्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई